नसन - ४
दस्त क्र. (७१०८/२००८)
२ — ३४

डिल कन्स्ट्रक्शन्स, रजि. भागिदारी फर्म
ठि. घर नंबर १०१६, शुक्ल लेन, नाशिक
पॅन नं. एएमसीपीएस २७५१ सी
तर्फे भागिदार
श्री. दिलीप वामन शुक्ल
वय - ५० वर्षे, धंदा - शेती व व्यापार,
रा. सायली, विनायक कॉलनी,
सावरकर नगर, गंगापुर रोड, नाशिक

} **लिहून घेणार**

यांसी...

शिवानंद गुरु हरिहरानंद ट्रस्ट
सार्वजनिक न्यास याचा नोंदणी क्रमांक -
पीटीआर - अे-६४८, दि. ०७/०७/१९६९
ठि. चिंचबन, पंचवटी, नाशिक
तर्फे विद्यमान विश्वस्त

} **लिहून देणार**

१. **श्री. विष्णुप्रसाद धनशंकर दवे**
उ.व. ८३, व्यवसाय - व्यापार
२. **श्री. नारायण वामन सातपुरकर**
उ.व. ८६, व्यवसाय - व्यापार
३. **श्री. वसंतराव परशराम बोधले**
उ.व. ६७, व्यवसाय - व्यापार
४. **श्री. नामदेव मनोहर धात्रक**
उ.व. ६०, व्यवसाय - व्यापार
५. **श्री. हेमंत हरिभाउ धात्रक**
उ.व. ४२, व्यवसाय - व्यापार

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-4

पान...३...वर

Scanned by CamScanner

नसन - ४
दस्त क्र. ७१०६ /२००८)
३ — ३४ ३

६. **श्री. रमेश महादेव केंगे**

उ.व. ६५, व्यवसाय - व्यापार,

७. **श्री. श्रीनिवास शिवराम ओढेकर**

उ.व. ५५, व्यवसाय - वकीली,

सर्वांचा पत्ता - चिंचबन,

पंचवटी, नाशिक

कन्फरमेशन डीड लिहून देतो ऐसा जे की,

१. मिळकतीचे वर्णन :-

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगपालिका हद्दीतील, नाशिक येथील स्थावर मिळकत येणे प्रमाणे.

अ. सिी सर्व्हे नंबर ५८७५/३, यासी क्षेत्र ३३९.८३ चौरस मीटर्स यासी चतु:सिमा येणेप्रमाणे

पुर्वेस	:-	सदर सि.स. नंबर पैकी मिळकत.
पश्चिमेस	:-	सदर सि.स. नंबर पैकी मिळकत.
दक्षिणेस	:-	गोदावरी नदी
उत्तरेस	:-	सदर सि.स. नंबर पैकी जमिन

ब. सिटी सर्व्हे नंबर ५८७५/१/९, यांसी क्षेत्र ४५४.६७ चौरस मीटर्स यांसी चतु:सिमा येणे प्रमाणे...

पुर्वेस	:-	सि.स. नं. ५८७५/१/१०
पश्चिमेस	:-	सि.स. नंबर ५८७५/३ व सि.स. नंबर ५८७५/१/६
दक्षिणेस	:-	वहिवाटीचा रस्ता
उत्तरेस	:-	सि.स. नं. ५८७५/१/७

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-4
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-४

पान...४...वर

Scanned by CamScanner

नसन - ४

दस्त क्र.(३१०४/२००८)

४ — ३४

येणेप्रमाणे चतु:सिमेतील शेत मिळकत जल, तरु, काष्ट, पाषाण, निधीनिक्षेपासह व जाणेयेणेचे वागवहिवाटीचे हक्कासह विहीरीचे हक्कासह मिळकत दरोबस्त.

सदर दस्तामध्ये लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही व लिहून देणार यांचा उल्लेख आम्ही असा केलेला असून तसेच वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा उल्लेख सदरची मिळकत असा केलेला असून तो तसा वाचण्यात व समजण्यात यावा.

२. वर कलम १ यांत वर्णन केलेली आमचे ट्रस्टचे मालकीची मिळकत आम्ही तुम्हांस विकसनास दिलेली आहे. त्यातील सिटी सर्व्हे नंबर ५८७५/३ ह्याचे क्षेत्र ३३९.९३ मीटर्स ह्या जागेचे मोजमाप दक्षिण उत्तर ६२ व पुर्ण पश्चीम लांबी ५९ फूट ह्या जागेवर स्वतंत्र असे मंजुर प्लॅनच्या ४० टक्के बिल्टअप क्षेत्र आम्हास तुम्ही बांधुन द्यावयाचे आहे. सदर इमारतीचे नकाशे तुम्ही आमच्या सुचनेप्रमाणे व आमचे मनाप्रमाणे ढोबळ मनाने तयार केलेले आहेत. परंतु अंतिम नकाशा व इमारत ही ना.म.न.पा. कडून टाउन प्लॅनिंग ॲक्टचे नियमानुसार मंजुर प्लॅन प्रमाणेच होईल. ह्या नियमाप्रमाणे आपण केलेल्या नकाशात जे काही नियमानुसार बदल होतील ते आम्हांस मान्य व कबुल राहतील. बिल्टअप क्षेत्र मोजतांना बांधकामातील खोल्या/बाल्कनी जिने दोन्ही इमारतीच्या मधला हॉल स्टेज [illegible] इ. गोष्टींचा समावेश असेल. सदर क्षेत्रफळ मोजतांना प्रत्यक्ष जागेवरील बांधकाम विचारात घेतले जाईल त्यात नाशिक महानगपालीके कडील मंजुर प्लॅन वरील क्षेत्राचा काही एक संबंध राहणार नाही. प्लॅन व्यतिरिक्त जागेत काही मंदिरे/समाधी/पाणपोई योग्य प्रकारे बांधणे झाल्यास त्याचाही समावेश आम्हाला द्यावयाच्या बांधीव क्षेत्रात करणेत येईल. सदर बाबीचा स्पष्ट उल्लेख डेव्हलपमेंट करारनाम्यातील परिशिष्ट २ मध्ये केला

पान...५...वर

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-4 सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-४
सत्यमेव जयते

Scanned by CamScanner

नसन - ४

दस्त क्र. ३१०७ /२००८)

५ — ३४

आहे. ह्या व्यतिरिक्त तुम्ही आम्हास रक्कम रुपये १,११,०००/- अक्षरी रुपये एक लाख अकरा हजार मात्र विकसन करारनामा नोंदणेचे वेळी देणेचे आहेत. तसा विकसन करारनामा दिनांक ०२/०१/२००७ रोजी जनरल स्टॅम्प रुपये १००/- वर लिहून ठेवलेला आहे. सदरहु डेव्हलपमेंट करारनाम्याची नोंद श्री. ॲडव्होकेट नोटरी किरण बी. चांदवडकर, नाशिक यांचेकडे अ.नं. २/२००७ ने दिनांक ०२/०१/२००७ रोजी केलेली आहे. सदरचे डेव्हलपमेंट करारनाम्यास कमी लावलेली मुद्रांक शुल्क रुपये ५५,५२०/- व दंड रुपये १७,७७०/- मिळून एकूण रक्कम रुपये ७३,२९०/- अक्षरी रुपये त्र्याहत्तर हजार दोनशे नव्वद मात्र तुम्ही मे. मुद्रांक जिल्हाधिकारी साहेब, नाशिक यांचेकडे दिनांक ०७/०४/२००८ रोजी चलन नंबर ३९४/०७-०८ ने भरलेली आहे. तसेच दि. ३० जानेवारी, २००८ रोजी मे. धर्मदाय सह आयुक्त साहेब नाशिक यांनी कलम ३६ (अ) १ अन्वये परवानगी दिली असल्याने सदरचा डेव्हलपमेंट करारनामा आम्हाला आजही मान्य व कबुल आहे. विकसन करारनाम्यात ठरले प्रमाणे आज रोजी तुमचेकडून रु. १,११,०००/- (अक्षरी रु. एक लाख अकरा हजार मात्र) चा भरणा चेक नं. ८५०५४५ युनायटेड बँक ऑफ इंडीया ने पावला. भरणाबद्दल तक्रार नाही.

हे कन्फर्मेशन डीड आम्ही तुम्हांस राजीखुशीने व स्वसंतोषाने समजून उमजून लिहून दिले आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-4 — सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-४

कन्फरमेशन डिड लिहून घेणार

श्री. दिलीप वामन शुक्ल

भागिदार

डिल कन्स्ट्रक्शन्स.

पान...६...वर

Scanned by CamScanner